# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 15 March 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १५ मार्च २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून सुरू होणाऱ्या `माय भारत बजेट क्वेस्ट २०२६` स्पर्धेच्या राज्य आणि केंद्रशासित प्रदेश स्तरावरच्या विजेत्यांशी संवाद साधणार आहेत. या उपक्रमाचा मुख्य उद्देश तरुणांना केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणं आणि `विकसित भारत` निर्मितीबाबत त्यांचे विचार मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा आहे. या कार्यक्रमाचं उद्दिष्ट युवा प्रतिभांना सहभागी शासन आणि आर्थिक नियोजनाशी जोडणं हे आहे. तसंच, हा उपक्रम धोरण निर्मितीमध्ये तरुण पिढीची भूमिका अधिक मजबूत करेल आणि २०४७ पर्यंत `आत्मनिर्भर विकसित भारत` उभारण्यात मोलाचं योगदान देईल. `माय भारत बजेट स्पर्धा २०२६` मध्ये १२ लाखांहून अधिक तरुण स्पर्धकांनी सहभाग घेतला असून, एकूण ४७ हजार निबंध सादर करण्यात आले आहेत. केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ हा प्रामुख्यानं `युवाशक्ती-प्रेरित` अर्थसंकल्प मानला जात आहे. हा अर्थसंकल्प शिक्षण, कौशल्य विकास, उद्योजकता, नाविन्यपूर्ण संशोधन आणि भविष्यातील विकासाच्या संधींमध्ये गुंतवणूक करून देशातील तरुणांना सक्षम करण्यावर विशेष भर देतो. या संदर्भात, `माय भारत` मंचावरची ही स्पर्धा एक अनोखा आणि महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणून समोर आली आहे.

****

आजचा दिवस ` जागतिक ग्राहक हक्क दिन ` म्हणून संपूर्ण जगभरात साजरा करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामाजिक माध्यमांवर या दिनाच्या शुभेच्छा देतांना,‘ चला, उत्पादनांच्या गुणवत्तेला प्राधान्य देऊया, फसवणुकीपासून स्वतःचं संरक्षण करुया आणि एक सुजाण आणि सजग ग्राहक होऊया! ’, असं आवाहन केलं आहे.

****

चंद्रपूरच्या कोळसा वायूकरण आणि आणि कार्बन संकलन प्रक्रिया प्रकल्पाचं काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन झालं. केंद्रीय कोळसा आणि खाणमंत्री किशन रेड्डी हेही यावेळी उपस्थित होते. या प्रकल्पाचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होणार नाही असं तंत्रज्ञान केंद्र सरकारने आणलं असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केलं. कोळसा वायूकरणात अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणारे सात प्रकल्प भारतात सुरू होत असून त्यातले चार प्रकल्प विदर्भात असणार आहेत. यातून आवश्यक ती रसायनं आणि कार्बन संकलन केलं जाईल, युरियासुध्दा तयार होईल मात्र या पर्यावरण पूरक प्रकल्पाच्या माध्यमातून कुठलंही प्रदूषण होणार नाही ही बाब भारतासाठी वरदान ठरणार आहे असं मुख्यमंत्री म्हणाले.

***

चार राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या निवडणुकांची घोषणा आज केली जाणार आहे. निवडणूक आयोग दुपारी चार वाजता पत्रकार परिषदेमध्ये  पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, असाम, पुदुचेरी येथील निवडणुकांच्या तारखांची माहिती देईल.

****

जर्मनीची राजधानी बर्लिन इथं होणाऱ्या जगातल्या सर्वात मोठ्या पर्यटन व्यापार मेळाव्यात पुढच्या वर्षी छत्रपती संभाजीनगर महापालिकेचं दालन असेल, अशी घोषणा महापौर समीर राजुरकर यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि इंटॅक यांच्या संयुक्त विद्यमानं आज झालेल्या विशेष 'हेरिटेज वॉक' मध्ये ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या तत्कालीन औरंगाबाद शहर भेटीच्या ऐतिहासिक घटनेला यंदा ३६० वर्षे पूर्ण होत आहेत. या स्मृतींना उजाळा देण्यासाठी ही फेरी घेण्यात आला. इतिहासानुसार, पुरंदरच्या तहानंतर पाच मार्च १६६६ रोजी रायगडावरून आग्रा प्रवासासाठी निघालेले छत्रपती शिवाजी महाराज साधारण आठवडाभरात तत्कालीन औरंगाबादला पोहोचले होते, महाराजांचा हा प्रवास आणि औरंगाबाद मुक्कामाबाबत यावेळी इतिहास अभ्यासक संकेत कुलकर्णी आणि आदित्य वाघमारे यांनी माहिती दिली. शहराच्या ऐतिहासिक वारशाची माहिती सांगणारे असे ११ होरिटेज वॉक या वर्षात होणार असल्याचंही महापौरांनी यावेळी सांगितलं. नागरीकांनी शहराचा हा ऐतिहासिक वारसा जपण्याचं

त्यांनी आवाहन केलं. या कार्यक्रमात महापालिकेच्या वतीने स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

****

येत्या दोन दिवसांत बीड आणि परभणीत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तसंच मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघरमध्ये उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या काळात पुणे, सिंधुदुर्ग, नाशिकचा घाटमाथा इथं हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची तर कोल्हापूर, सातारा, सांगली इथं वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

****

रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी कर्जतचे शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्याविरोधात तब्बल ६५ कोटी ३ हजार रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केला आहे. आमदार थोरवे यांनी खोपोली येथील एका हत्येच्या संदर्भात केलेल्या गंभीर आणि निराधार आरोपांमुळे आपली प्रतिमा मलिन झाल्याचा दावा करत हा खटला दाखल करण्यात आला आहे. हा दावा माणगाव येथील दिवाणी न्यायालयात दाखल करण्यात आला असून, या प्रक्रियेसाठी सुमारे ३ लाख रुपयांचे न्यायालयीन शुल्कही भरल्याची माहिती समोर आली आहे.

****